# आर्थिक बचतीसाठी आयुर्विमा हा उत्त्कृष्ट पर्याय

## ज्योती तोडकर

केसरी वृत्तसेवा

कुंडल: सद्याच्या धकाधकीच्या काळामध्ये प्रत्येकाने स्वतःसाठी व कुटूंबासाठी आर्थिक तरतुद करणे गरजेचे असून आयुर्विम्यामुळे बचत व संरक्षण हे दोन्ही हेतु साध्य होतात. त्यामुळे आर्थिक बचतीसाठीच्या असलेल्या पर्यायापैकी आयुर्विमा हा उत्कृष्ट पर्याय असल्याचे विमा सल्लागार ज्योती तोडकर यांनी सांगितले.

त्या क्रांतीअग्रणी डा.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्यावतीने भित्तीपत्रीका उदघाटन व आयुर्विम्यातील विविध सेवा या विषयावर आयोजित कार्यशाळेमध्ये बोलत होत्या. यावेळी विमा सल्लागार राहुल तोडकर, प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल, जेष्ठ डॉ. प्रताप लाड, डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. प्रविणकुमार लुपणे, प्रा. विद्या घाईल-पवार आदी उपस्थित होते.



कुंडल : क्रांतीआग्रणी महाविद्यालयातील कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आयुर्विमाविषयि माहिती देताना ज्योती तोडकर.

राहुल तोडकर यांनी विम्याचे प्रकार, विमा उतरविणे, विमा रक्कम परत मिळविणे व आर्थिक नियोजनातून स्वतःचे भविष्य घडविणे याविषयी माहिती दिली.

स्वागत सिनिका कौले, पाहुण्याची ओळख प्रांजली सुर्यवंशी, आभार शिवानी खेतमल हीने मानले. सुत्रसंचलन प्रथमेश जोशी, मृणाली चव्हाण, श्रद्धा जाधव यांनी केले. याप्रसंगी कामर्स विभागाचे सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दै. केसरी दि. ०२/१०/२०२४



कुंडल : येथील क्रांतिअग्रणी महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या मजकुराचे वाचन करताना पायल जाधव. या वेळी उपस्थित मान्यवर.

# डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

**सकाळ वृत्तसेवा**

कुंडल, ता. १६ : येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करणेत आला.

वाचन ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असते, वाचनामुळे मनुष्य ज्ञान संपन्न होऊन त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते म्हणून भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात येते.

यंदा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या वतीने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असलेल्या मजकुराचे सामुदायिक वाचन करणेत यावे, असे सर्व महाविद्यालयांना कळविले होते. त्यानुसार महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करणेत आले. त्यानंतर शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या मजकुराचे वाचन बी,ए.भाग तीनची विद्यार्थिनी पायल जाधव हिने केले.

या कार्यक्रमाचे संयोजन ग्रंथालय, एन. एस. एस. व एन. सी. सी. विभागाच्या वतीने करणेत आले. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

दै. सकाळ
दि. १५/१०/२०२४



कुंडल : वाचन प्रेरणा दिनानिमित्त मजकुराचे वाचन करताना कु. पायल जाधव, यावेळी उपस्थित मान्यवर.

# डॉ. जी.डी. बापू लाड विद्यालयात वाचन प्रेरणादिन

**कुंडल :** येथील क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करणेत आला. वाचन ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये अत्यंत महत्वाची प्रक्रिया असते. वाचनामुळे मनुष्य ज्ञानसंपन्न होऊन त्याचा व्यक्तीमत्व विकास होण्यास मदत होते. भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेत येतो. यंदा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५०व्या राज्याभिषेक सोहळयाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापिठाच्या वतीने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनी शिवराज्याभिषेक सोहळयाचे वर्णन असलेल्या मजकुराचे सामुदायिक वाचन करणेत यावे असे कळविले होते त्यानूसार महाविद्यालयामध्ये कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करत मजकुराचे वाचन बी.ए.भाग तीनची विद्यार्थीनी पायल जाधव हीने केले. संयोजन ग्रंथालय, एन.एस.एस. व एन.सी.सी. विभागाच्या वतीने करणेत आले. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दै. तरुण भारत
दि. १५/१०/२०२४

# डॉ. जी. डी. बापू महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

केसरी वृत्तसेवा

**कुंडल :** येथील क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

वाचन ही व्यक्तीच्या सर्वांगिण विकासामध्ये अत्यंत महत्वाची प्रक्रीया असते, वाचनामुळे मनुष्य ज्ञान संपन्न होऊन त्याच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगिन विकास होण्यास मदत होते म्हणून भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करणेत येतो. यंदा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून शिवाजी विद्यापिठाच्या वतीने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असलेल्या मजकुराचे सामुदायीक वाचन करण्यात यावा, असे सर्व महाविद्यालयांना कळविले होते. त्यानूसार महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दूल कलाम यांच्या प्रतिमेस आभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या मजकुराचे वाचन बी.ए.भाग तीन ची विद्यार्थीनी पायल जाधव हीने केले. या कार्यक्रमाचे संयोजन ग्रंथालय, एन.एस.एस. व एन.सी.सी. विभागाच्या वतीने करणेत आले, यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



कुंडल : क्रांतीआग्रणी महाविद्यालयामध्ये शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या मजकुराचे वाचन करताना पायल जाधव.

दै. केसरी
दि. १८/१०/२०२४